स्थायी समिती
दाखल विषय – दि. १९/१/२०२१

विषय क्रमांक :– १००० त्वर्य

पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या इ. १० वी व इ. १२ वी (वाणिज्य व विज्ञान शाखा) च्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांना भरावयाचे परिक्षा शुल्क माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या नावे आरटीजीएसद्वारे देणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/शि.वि.माध्य.व तां./६२३ दि. १८/१/२०२१ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका संचलित कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इ. १२ वी च्या परिक्षेस एकूण ४०५ विद्यार्थी प्रवेशित झाले असून त्याप्रित्यर्थ र.रु. १,८१,१८५/– (नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय– र.रु. १,०८,८८०/–, श्रीमती सावित्रीबाई फुले प्रशाला – र.रु. १२,९००/–, कै.बाबुराव सणस प्रशाला – र.रु. १३,३३०/–, रफी अहमद किडवाई उर्दु विद्यालय – र.रु. २८,९७५/–, स्वा.से.हकीम अजमलखान उर्दु विद्यालय – र.रु. १७,१००/–) संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांना आरटीजीएसद्वारे आदा करणेस,
२) इ. १० वी मध्ये ४३ माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या ही ३६०६ असून प्रती विद्यार्थी र.रु.४१५/– तसेच तंत्र शाळेतील २०० विद्यार्थी असून प्रति विद्यार्थी परिक्षा शुल्क रु. ५२५/– याप्रमाणे एकूण र.रु. १६,०१,४९०/– महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे परिक्षा शुल्क भरणेकामी सदर रक्कम संबंधित ४३ माध्यमिक शाळांना आरटीजीएसद्वारे आदा करणेस,
३) इ. १० वी मध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अंदाजित असल्याने उपरोक्त रकमेपेक्षा कमी/अधिक होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास,
४) एकूण ४०५ विद्यार्थ्यांसाठी इ. १२ वी च्या परिक्षेसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेकडे भरावयाचे शुल्क र.रु. १,८१,१८५/– (अक्षरी रक्कम रुपये एक लाख एक्याऐंशी हजार एकशे पंच्याऐंशी फक्त) आणि इ. १० वी च्या विद्यार्थ्यां प्रित्यर्थ महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेकडे भरावयाच्या शुल्कापोटी र.रु. १६,०१,४९०/– (अक्षरी रक्कम रुपये सोळा लाख एक हजार चारशे नव्वद फक्त) किंवा प्रत्यक्ष होणारा खर्च RE13A153 इ. १० वी व इ. १२ वी विद्यार्थी परिक्षा शुल्क भरणे या अर्थशिर्षकाच्या तरतुदीमधून खर्ची टाकणेस.

विषय क्रमांक :– १००१ त्वर्य

आऊट सोर्सिंग एजन्सीमार्फत तीन महिने मुदतीकरीता २०० लिपीक संवर्गातील कार्यालयीन सहाय्यक यांची नियुक्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार विद्या ऑनलाईन सर्व्हिसेस, पुणे प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,५०,००,०००/– पेक्षा –२०.०४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,१९,९४,०००/– प्रत्यक्ष होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/टॅक्स/६२४ दि. १८/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १००२ त्वर्य

**कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागांतर्गत विविध संवर्गातील पदांची सेवा तात्पुरत्या स्वरुपात ४४ दिवसांकरिता घेतलेल्या उमेदवारांच्या सेवेस १ दिवस तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देणेसाठी खालील बाबीस** मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६३० दि. १९/१/२०२१ चे पत्र.

१. ४४ दिवसांच्या कालावधीकरिता कार्यरत असलेल्या ११७ सेवकांना पुढील ४४ दिवसांच्या कालावधी करिता मुदत वाढ देणेस,
२. सदर कालावधीमध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी झाल्यास व खात्यास या सेवकांची गरज न भासल्यास सदर सेवकांची सेवा संपुष्टात आणणेस,
३. ४४ दिवसांच्या कालावधीकरिता कार्यरत असलेल्या ११७ कंत्राटी सेवकांचा नियुक्तीचा कालावधी दि. ०६/०१/२०२१ रोजी संपणार असून दि. ०७/०१/२०२१ रोजी १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ४४ दिवसांच्या कालावधी करिता रुजू करून घेणेस,
४. आज्ञापत्रक आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करणेस,

विषय क्रमांक :– १००३ त्वर्य
मा.दिपक पोटे, मा.सौ.सुनिता गलांडे व मा.सौ.वर्षा तापकीर यांचे दि. १९/१/२०२१ चे पत्र.

पुणे मनपा करीता कचरा वाहने चालविणेसाठी ठेका पध्दतीने वाहन चालक सेवक पुरविणे (निविदा क्र. २६५–सन २०१८–१९) सदरील कामाची मुदत दि. ७ जानेवारी २०२१ रोजी संपत असल्यामुळे व नविन निविदा प्रक्रिया अपूर्ण असल्यामुळे वरील कामास ठरावाच्या दिनांकापासून २१ दिवस मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– १००४ त्वर्य
मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. १५/१/२०२१ चे पत्र.

सद्‌गुरु स्वयमसेवी सामाजिक संस्था ही सहाय्यक संस्था निबंधक, पुणे विभाग येथे रजिस्टर संस्था असून या संस्थेच्या माध्यमातून अनेक सुशिक्षित व बेरोजगार तसेच महिलांना व गरज नागरिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात येतो.

त्यामुळे सद्‌गुरु स्वयमसेवी सामाजिक संस्था यांसकडून शान निर्णय २००२ नुसार विविध सवलती देऊन र.रू. ३ लाखापर्यत पुणे मनपाच्या क्षेत्रिय कार्यालयाची विविध प्रकारच्या कामांची निविदा तसेच विविध सेवा व वस्तु घेण्यासाठी कामे विना निविदा देण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– १००५ त्वर्य
मा.सुनिल कांबळे, आमदार व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि. १९/१/२०२१ चे पत्र.

कोरल्स डिझाईन प्रा.लि., फ्लॅट नं. ४६, औदुंबर अपार्टमेंट, अे विंग, सर्व्हे नं. २०७, पर्वती, पुणे ९ ही फर्म गेले अनेक वर्षापासून आर्किटेक्ट कन्स्लटंट म्हणून चांगल्या रितीने काम करीत आहे.

त्यांच्या इतक्या वर्षाच्या कामाचा व अनुभवाचा विचार करता त्यांना पुणे मनपा पथ तसेच भवन व उद्यान विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या निरनिराळया पुलांचे व रस्त्यांचे कामाकरीता सल्लागार यांचे यादीत तज्ञ सल्लागारांच्या पॅनेल वर्ग (I)(प्रोजेक्ट र.रुपये ०.० ते ५.०० कोटीपर्यंत) समाविष्ट करणेस मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– १००६ त्वर्य
मा.गणेश ढोरे यांचे दि. १८/१/२०२१ चे पत्र.

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये २०१७ साली नव्याने समाविष्ट झालेली ११ गावे ही ग्रामीणसदृश्य परिसर असणारी असलेमुळे या समाविष्ट ११ गावांच्या परिसरात आजतागायत मुलभूत सुविधा पुरवू शकलेली नाही. मुख्य पुणे शहराच्या तुलनेने हा ११ गावांचा समाविष्ट भाग विकासकामांच्या बाबतीतही आजपर्यंत मागास राहिलेला आहे. पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेवर या गावांतील मुलभूत सोई सुविधा तरी प्राधान्याने उपलब्ध होतील अशी या भागातील नागरिकांना अपेक्षा होती. परंतु समाविष्ट गावांतील परिसरात पाणी, ड्रेनेज, पक्के रस्ते, प्रकाशव्यवस्था, शिक्षण, आरोग्य या मुलभूत सुविधांचा अभाव दिसून येतो. पुणे महानगरपालिकेत ११ गावे समाविष्ट झालेपासून आजतागायत या परिसरात मुलभूत सोईसुविधा उपलब्ध करून देण्यामध्ये पुणे महानगरपालिकेला संपुर्ण अपयश आलेले आहे. सध्या या ११ गावातुन आकारला जाणारा कर आकारणीदर हा सुध्दा अवाजवी प्रमाणात आहे ही दुर्देवी बाब आहे.

नजिकच्या काळामध्ये महानगरपालिकेत नव्याने २३ गावे समाविष्ट केली आहेत. या २३ गावातील वस्तुस्थिती ही काही वेगळी नाही. त्यामुळे महानगरपालिकेने नुकतीच जाहीर केलेली ११ टक्के करवाढ या यापुर्वी समाविष्ट ११ गावांना तसेच आता नव्याने समाविष्ट २३ गावांना लागू करू नये. या समाविष्ट ११ व २३ गावांमध्ये जोपर्यंत मुलभूत सुविधांचे जाळे निर्माण होत नाही, तोपर्यंत महानगरपालिकेने या ११ गावांना व नविन २३ गावांना जुन्या ग्रामपंचायत दराने करआकारणी करावी.

विषय क्रमांक :– १००७ त्वर्य
मा.सौ.उज्ज्वला जंगले व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. १९/१/२०२१ चे पत्र.

पुणे पेठ हडपसर,पुणे–सोलापूर रेल्वे लाईन,रेल्वे फाटक क्र.७ व ८ (ससाणेनगर ते काळेपडळ)या दरम्यान रेल्वे लाईनला समांतर एकूण २ डी.पी.रस्ते आहेत.(रुंदी प्रत्येकी १२ मी.) सदर रेल्वे फाटक क्र.७ व ८ या दरम्यान स.नं.४३ब येथे रेल्वे विभागाने दोन स्वतंत्र भुयारी मार्ग रेल्वे

लाईन क्रॉसिंग करीता बांधले आहेत. या भुयारी मार्गातून मोठ्या प्रमाणावर वाहतुक सुरू होणार आहे. त्यामुळे ही वाहतूक दोन्ही बाजूने सुरळीतपणे वळणाकरीता रेल्वे क्रॉसिंगग समोरील १२ मी.डी.पी.रस्त्याची रूंदी चे एमएमसी ॲक्ट चे कलम क्र.२१० अन्वये रस्ता आखण्यात यावा. त्यानूसार पूर्व–पश्चिम १२ मी.डी.पी.रस्त्याची रुंदी पश्चिमकडे ओढ्यापर्यंत व पूर्वेस आवश्यक त्या अंतरापर्यंत वाढवून १८ मी.करणेत यावी.(स.नं.४३ ब हडपसर)

विषय क्रमांक :– १००८ त्वर्य

औंध येथील महर्षी शिंदे पुलाखालील नदीतील मलवाहिनी स्थलांतरीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सदानंद जोशी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८४,७८,५४१/– पेक्षा ०.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८३,९३,८४०=३८ व अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,०७,२६०=८५ एकूण र.रु. ९४,०१,१०१=२३ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/६१९ दि.१४/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १००९ त्वर्य

पुणे पेठ पर्वती, फायनल प्लॉट क्रमांक ४९९ व ५००अ स्वारगेट येथील २८ हजार चौ. या जागेवर उभारण्यात येणाऱ्या मल्टी मॉडेल हब या व्यावसायिक संकुल मधून मिळणाऱ्या उत्पन्नातून ४०-५० टक्के हिस्सा पुणे मनापास देणे बंधनकारक केले पाहिजे व अशी अट करारनाम्यात समाविष्ट करणेत यावी याबाबत मा.आबा बागुल यांचे दि.३०/७/२०२० चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३८० दि. ११/८/२०२० ला **अनुसरुन** मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/माव्य/३५८ दि.१३/१०/२०२० ने पाठविलेला अभिप्रायावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ६५४ दि. २०/१०/२०२० ला **अनुसरुन** मेट्रोकडील दि. ७/१०/२०२० चे पत्रानुसार मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/माव्य/६२० दि.१५/१/२०२१ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

विषय क्रमांक :– १०१० त्वर्य

धनकवडी–सहकारनगर क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र. ४० क मधील दत्तनगर चौक ते जांभुळवाडी रोड परिसरातील रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणारे एच.टी.लाईन भुमिगत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पी.डी.कुदळे इलेक्ट्रीक यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.७५,८१,९९६/– पेक्षा २१.७८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५९,३०,६३७=२७ अधिक जी.एस.टी. १२% र.रुपये ७,११,६७६=४७ असे एकूण र.रुपये ६६,४२,३१३=७४ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/६२६ दि.१९/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०११ त्वर्य

पर्वती पायथा येथे चित्रकला, शिल्पकला सराव व प्रात्याक्षिकांसाठी तसेच पेशवे सृष्टी साठी व्यवस्था व दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.विशाल ॲन्ड आकाश असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५५,६८,६५५/– पेक्षा ३.१०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र. रु. ५७,४१,२८३=३० पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ६,८८,९५३=९९ पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये ७,०६७/– पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ८,५०५/– पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/६२७ दि.१९/१/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– १०१२ त्वर्य

आरोग्य खात्याकडे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी करार पद्धतीने एकवट वेतनावर विविध संवर्गातील पदांच्या सेवांना मुदत वाढ देणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६२९ दि. १९/१/२०२१ चे पत्र.

१. ६ महिने कालावधीकरिता कार्यरत असलेल्या एकूण ७१ वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.), ८ दंतशल्यचिकित्सक, ६२ स्टाफ नर्स, २२ प्रयोगशाळा तंत्रज्ञ व १४ फार्मासिस्ट असे एकूण १७७ कंत्राटी सेवकांना यांना सेवाकाळ संपुष्टात आल्यानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील तीन महिन्यांच्या कालावधीकरिता मुदत वाढ देणेस,

२. सदर पदावरील सेवांकरीता संबंधित सेवकांकडून नव्याने करारनामे करून घेणेस,

३. आज्ञापत्रक आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने निर्गमित करणेस,

विषय क्रमांक :– १०१३ त्वर्य

औंध बाणेर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत आऊट सोर्सिंग पध्दतीने हद्दीतील झाडणकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोरया एंटरप्रायझेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३,७३,६२,६००/– पेक्षा १.९९% जास्त) असल्याने या कामाचे यापुर्वी मागविण्यात आलेल्या निविदेचे ठेकेदार मे. नंदिनी एंटरप्रायझेस यांनी सादर केलेला दर १.४४% जास्त तर सदर निविदेचे सर्वात कमी दराचे ठेकेदार मे. मोरया एंटरप्रायझेस यांनी सादर केलेला दर १.९९% जास्त इतका आहे. थकीत खालील उल्लेख केलेल्या कालावधीतील कंत्राटी कामगारांचे वेतन १.९९% जास्त दराने अदा करावा लागणार आहे. दोन्ही ठेकेदारांच्या दरातील फरक नगण्य असल्याने मनपाचे आर्थिक नुकसानही फारसे होणार नाही. त्यामुळे या कामाचे सर्वात कमी दर सादर करणारे ठेकेदार मे.मोरया एंटरप्रायझेस यांचेकडून त्यांनी सादर केलेला सर्वात कमी दर (१.९९%) जास्त दराची उपलब्ध तरतुद पर्यंतची र.रु.३,८१,०६,११५=७४ (अक्षरी र.रु. तीन कोटी एक्क्याऐंशी लाख सहा हजार ऐकशे पंधरा रुपये चौर्याहत्तर पैसे फक्त) पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतन वाढ व विशेष भत्यातील भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणे, सदर कामे अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने व आऊट सोर्सिंग पध्दतीने कचरा संदर्भात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मागील थकीत माहे जुलै, सप्टेंबर, नोव्हेंबर व माहे डिसेंबर दि. ०८ पर्यंतचे कंत्राटी कामगारांची सेवा बंद केलेल्या तारखेपर्यंतचे वेतन अदा करण्यास तसेच सदर सेवकांची सेवा पुर्ववत केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दि.८/१/२०२१ पासून कंत्राटी पध्दतीने काम करुन घेणेस व त्याबाबतची देयके संबंधितांना अदा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.२/६३१ दि.१९/१/२०२१ चे पत्र.

शिवाजी दौंडकर<br>
प्रभारी नगरसचिव,<br>
पुणे महानगरपालिका.